**कंपनी: न्यु महाराष्ट्र ट्रेडर्स, २०, नवी पेठ, जुने बस स्टॅण्ड समोर, जलगांव ४२५००१**

अनिल जोशी 8805028021 विवेक जोशी 8380055953

# कांदा बी : विवेक भिमा किरण

कृपया या पुड्यातील प्लॅस्टीकची पिशवी एका कोपऱ्यातून थोडीशी कापा, त्यातून थोडे (१०० ते २०० दाणे) बीयाणे काढून घ्या, त्या बीयाण्याची ऊगवण क्षमता तपासून आपल्या पध्दतीने खात्री करून घ्या, मगच पुड्यातले संपूर्ण बिघाणे वापरात घ्या. सॅंपलव्दारे बीयाण्याच्या ऊगवण क्षमतेची चाचणी करुनच या पुड्यातील संपूर्ण बीयाणे वापरावे.

कांदे गोलाकार, मध्यम ते मोठ्या आकाराचे, हलक्या लाल रंगाचे, मध्यम ते तिखट चवीचे ९ ते १० महिने साठवण क्षमता असलेले टिकाऊ, खराब कांद्याचे प्रमाण कमी असलेले असतात. लागवडी पासून ११० ते १३० दिवसात तयार होते व सरासरी अपेक्षीत हेक्टरी उत्पन्न ६०० ते ८०० क्विं.

**शिफारस क्षेत्र :** महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश व इतर सौम्य हवामानचे प्रदेश.

**जमीन :** पाण्याचा उत्तम निचरा होणारी, भुसभुशीत जमीन व सेंद्रीय खातांनी परिपूर्ण असलेली मध्यम ते कसदार जमीन कांद्याला चांगली मानवते,

**हंगाम शिफारस :** हे वाण भारतातील सर्व भागात रब्बी (सप्टेंबर ते नोव्हेंबर) मध्ये या वाणाची शिफारस करण्यात येते. व नंतर ३० ते ४५ दिवसांची पूनर लागवड करावी.

**बियाण्याचे प्रमाण :** हेक्टरी ७ ते ८ किलो बियाणे पुरेसे होते.

**रोपे तयार करणे :** रोपे तयार करण्यापूर्वी थावरम २ ग्राम प्रति कि. बियाण्याला चोळावे. रोप वाटीकेत तणांचा प्रादुर्भाव कमी होण्यासाठी रोप वाटीकेची जागा नांगरुन, भिजवून, पॉलीथीनने १० ते १५ दिवस झाकून निर्जंतुक करून घ्यावी. किंवा दर १०० चौ. मी. मा २५ ग्रा. ट्रायकोडर्मा विरीडी बुरशीचे मिश्रण, १२५० ग्रॅम कुजलेले शेणखतात मिसळून रोपवाटीकेच्या जागेत मिसळावे, जमीन चांगली भुसभुशीत करून त्यात

शेणखत व नत्रयुक्त खत्त चांगल्या प्रकारे मिसळावे. १ हेक्टर कांदा लागवडीसाठी १० आर जमीनीत रोप टाकावे.

या जमिनीत ४ ते ५ गाड्या कुजलेले शेणखत, २.५ किलो नत्र व ५ किलो स्पुरद मिसळावे व ३ मी. x १ मी. आकाराचे गादी वाफे तयार करून त्यात ५ से.मी. अंतरावर व २ से.मी. खोल लागवड करावी. रोपे ६ ते ८ आठवडयांची झाली की पूनर लागवड करावी.

**जमिनीची मशागत :** नांगरणी, कुळवणी करून जमीन चांगली भुसभुशीत करून घ्यावी, शेतात हेक्टरी २० टन शेणखत, ५० कि. नत्र ५० कि. स्पूरद ५० कि, पोटॅश-२०-२० कि, गंधक + १० कि.पी. एस.बी. पावडर पालाश चांगले मिसळावे. शेताचा उतार, जमीनीचा प्रकार, पाण्याचे साधन इत्यादींना अनुसरून गादी वाफे किंवा सपाट वाफे तयार करावे.

**पूनर लागवड :** सारखी वाढ झालेली व निरोगी रोपे निवडून वाफ्यांमध्ये १५ से.मी. ते १० से. मी. अंतरावर ३ ते ४ से.मी. खोल लावावी. पूनर लागवडी नंतर त्वरीत हलके पाणी दयावे.

**पाणी व्यवस्थापन :** खरीप हंगामात १० ते १२ दिवसांनी आवशयकतेनुसार पाणी द्यावे. जमीनीचा प्रकार, उतार, तसेच हवामानातील तपमान, आर्द्रता लक्षात घेवून पाण्याच्या पाळ्या द्याव्या , कांद्याला कंद पोसण्याच्या काळात पाण्याची कमतरता पडू देवू नये. तसेच आवश्यकते पेक्षा अती पाणी कांद्याला हानीकारक ठरते. या वाणाला सरासरी पाण्याच्या पाळ्या जास्त लागतात,

**खते :** पुनरलागवडी नंतर हेक्टरी २५ कि. नत्र युक्त खते ३ से ४ आठवड्यांनी व ६ ते ७ आठवड्यांनी अशा दोन हप्त्यात द्यावे, रोपे निस्तेज दिसत असल्यास १% डी.ए.पी. ०.५% मॅग्नेशीयम सल्फेटची ८ ते १० दिवसांच्या अंतराने दोन वेळा फवारणी करावी.

पिकाच्या चांगल्या वाढीसाठी १५, ३० व ४५ दिवसांनी १% पॉलीफीड (१९:१९:१९) ची फवारणी करावी आणि ६०, ७५ व ९० दिवसांनी १% मल्टीके (१३:००:४५) ची फवारणी करावी.

**पिक संरक्षण :** कांद्यांवर मुख्यत्वे करपा रोग व थ्रीप्स या रोगांचा प्रदूर्भाव होतो. थ्रीप्स साठी मोनोक्रोटोफॉस २ मि.ली. किंवा डेल्टामेथीन ०.४ मि.ली. किंवा प्रोफेनोफॉस २ मि.ली. प्रति लि. पाण्यात मिसळून १० दिवसाच्या अंतराने दोन वेळा फवारावे व करप्यासाठी बावीस्टीम किंवा एम्-४५ ५०० ग्राम प्रती एकर प्रमाणे फवारावे. या व्यतिरीक्त काही रोग व किड आढळल्यास जवळच्या कृषी केंद्रावर अथवा कृषी सहायकाचा सल्ला घ्यावा.

**काढणी व सुकवणी :** कांद्याच्या माना बारीक पडल्या म्हणजे कांदा काढणीसाठी तयार झाला असे समजावे, नंतर पाणी बंद करून जमीनीच्या अर्थवट वाफसा अवस्थेत काढणी करावी. नंतर त्याच्याच पातिने कांदा झाकून ४ से ५ दिवस रांगेतच सूकवणी करावी, म्हणजे साठवणीत खराबीचे प्रमाण कमी होते. कांद्याची सुकवणी आल्यावर कांद्याच्या पातीची कापणी करावी.

**साठवण :** कांद्याची साठवण सावलीत, खेळत्या हवेच्या व कभी तपमानाच्या ठिकाणी करावी, रब्बी कांद्याच्या दीर्घ कालीन साठवणी करीता शास्त्रशुध्द पध्दतीच्या चाळीची शिफारस करण्यात आलेली आहे.

**टिप :** कांदा पिक हवामानतील बदलांना अति संवेदनशिल असल्याने विपरीत हवामानात कांदा पिकात दोष येण्याची शक्यता असते त्यासाठी वेळो वेळी तज्ञांचा सल्ला घ्यावा.